Mogare Saurabh Hanuman
Junior Winner
Vidhya Vikas Madhyamik Vidyalaya
Latur



### “डिजिटल टेक्नोलॉजी: त्यामुळे तुमच्या जीवनात कशी सुधारणा होते? देशाच्या आणि नागरिकांच्या प्रगतीसाठी डिजिटल टेक्नोलॉजीच्या क्षेत्रात काय करण्याची गरज आहे असे तुम्हाला वाटते?”

‘डिजिटल टेक्नोलॉजी’ अर्थातच आधूनिक तंत्रज्ञान होय. आपण सगळे जण प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे (नकळत/कळत) तंत्रज्ञांनाचा वापर करतो सेलफोन, संगणक, लॅपटॉप, नोटबुक्स, सी, रॉम, व्हिडिओ डिस्कस, रेडिओ, केबल टि.व्ही. इ. इलेक्ट्रॉनिक साधनांच्या/उपकरणांच्या मदतीने आपल्या दैनंदिन जीवनात माहीती गोळा करणे, माहीतीची देवाणहोवाण करतो. इंटरनेट, ई-उपग्रह संप्रेषण, इंटरॲक्टिव्ह रेडिओ, लोकल आणि वाईड एरिया नेटवर्क आणि संगणक सिम्युलेशनचा वापर केल्याने माहीती गोळा करणे, माहीचे विश्लेषण करणे, ती वापरणे आणि इतरांना उपलब्ध करून देणे सहज शक्य होते. ध्वनी, प्रतिमा, सांख्यिकी किंवा शाब्दिक अशा वेगवेगळ्या स्वरूपातील माहीती निर्माण करण्यासाठी आणि वापरण्यासाठी तंत्रज्ञान वापर केला जातो. (संप्रेषण तंत्रज्ञान) सर्वांना परवडतील सोयीची असतील तसेच संगळ्यासाठी एकाच दर्जाचे शिक्षण देणे शक्य होईल अशी साधने वापरणे शक्य झाले आहे.

संप्रेषण तंत्रज्ञानांचा एक महत्वपुर्ण भाग म्हणजे इंटरनेट. देशभरातील कॉम्प्युटर्स एकमेंकाबरोबर जोडण्याची संकल्पना तयार करण्यात आली. सुरूवातीला फक्त संयुक्त राष्ट्रांची सरकार (US) आणि संयुक्त राष्ट्रातील काही विद्यापीठ जोडील होती. इंटरनेट हे आपत्कालीन सैन्य संपर्क प्रणाली होती जी डिपार्टमेंट ऑफ डिफेन्सेस ॲडव्हान्स रिसर्च प्रोजेक्ट एजन्सी द्वारा (ARDA) चालवली जात होती. १९६९ साली संपूर्ण ऑपरेशन ARPANET (ॲडव्हान्स रिसर्च प्रोजेक्ट एजन्सी नेटवर्क) म्हणून संबोधले गेले होते.

संप्रेषण तंत्रज्ञानाने मानवी जीवनावर एक अनोखी छाप पाडली आहे. उद्योग क्षेत्रात, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात, शिक्षण आणि प्रशिक्षण क्षेत्रात, व्यवसाय क्षेत्रात इ. क्षेत्रात आमुलाग्र बदल हाडवुन आणला आहे. संप्रेषण तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे (डिजिटल टेक्नोलॉजी) जग जवळ आले आहे. डिजिटल तंत्रज्ञान येण्यापूर्वी आपण ऑलाईन व अनलॉन तंत्रज्ञानाचा संप्रेषणासाठी वापर करत होतो डिजिटल संप्रेषण अधिक सुलभ, जलद आणि सुरक्षित झाले आहे. संगणक, लॅपटॉप, भ्रमणध्वनी (मोबाईल्स), टॅब्लेट पीसी अशी अनेक संप्रेषण तंत्रज्ञानाचे साधने आता बाजारात उपलब्ध झाले आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे देशाच्या संरक्षण क्षेत्रात मजबुती प्राप्त झाली आहे. तीन्ही दलातील सैनिकाला संभाव्य धोक्याची माहीती संप्रेषण तंत्रज्ञानामुळे क्षणार्धात मिळते. आपल्या देशाच्या विकासाच्या मार्गावर संप्रेषण तंत्रज्ञानाचा महत्वपुर्ण वाटा आहे. आपल्या भारतदेश एक ‘महासत्ता देश’ बनव्याच्या मार्गावर आहे. यात तंत्रज्ञानाचा अमुल्य वाटा आहे. संप्रेषण तंत्रज्ञान हा देशाच्या प्रगतीवर मोठी छाप पाडली आहे.

मानवाचे जीवन बदलण्यामध्ये संप्रेषण तंत्रज्ञानाचा मोठा वाटा आहे. संप्रेषण तंत्रज्ञानामुळे भविष्यात मानव हा पृथ्वीवरील सर्वाधीक शक्तिशाली आणि बलवान बनेन. संप्रेषण तंत्रज्ञानामुळे मानव आपले भविष्य बदलण्याचा प्रयत्न करेन. तो मुव्यवर विजय मिळवण्याचा पुरेपुर प्रयत्न करेन. संप्रेषण तंत्रज्ञान ऐवढे विकसित होईल की मानव मुव्यवर विजय मिळवेन. तो दिवस लांब नाही की मानव संप्रेषण तंत्रज्ञानाच्या प्रतीमुळे सर्व जगावर राज्य करेन. संप्रेषण तंत्रज्ञानामुळे मानव आपल्या जीवनाला अतिशय जैनी जीवन जगत आहे. मानव संप्रेषण तंत्रज्ञानाच्या साहय्याने आपले भविष्य बदलेन.


Marathi